# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

**ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु,**

## कृषी हवामानशास्त्र विभाग

फोन : ०२०-२५५३८००९ कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५ ई-मेल : amfupune@gmail.com


**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १६/१०/२०२०**

## जिल्हा : जळगाव

**हवामान अंदाज :**

| हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (१६/१०/२०२० ते २०/१०/२०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| पाऊस (मिमी) | 10 | 19 | 33 | 3 | 10 |
| कमाल तापमान (अं.से.) | 34 | 32 | 34 | 31 | 32 |
| किमान तापमान (अं.से.) | 25 | 24 | 24 | 23 | 24 |
| ढग स्थिती (आकाश) | 6 | 8 | 8 | 7 | 8 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 83 | 85 | 90 | 89 | 86 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 56 | 60 | 57 | 62 | 57 |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 5 | 6 | 8 | 7 | 7 |
| वाऱ्याची दिशा (अंश) | 119 | 252 | 307 | 287 | 224 |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र , मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक १६, १७ व १८ ऑक्टोबर २०२० रोजी काही ठिकाणी तर दिनांक १९ व २० ऑक्टोबर २०२० रोजी तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे.<br>**ईशारा :** जिल्ह्यात दि. १६, १७, १९ व २० ऑक्टोबर २०२० रोजी तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • पडण्याऱ्या पावसाचे पाणी शेतात, उभ्या पिकात साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्यासाठी उताराच्या बाजूने चर काढावी.<br>• पावसाची शक्यता असल्याने शेतकरी बांधवांनी स्वतःची तसेच आपल्या जनावरांची काळजी घ्यावी व जनावरे सुरक्षीत ठिकाणी बांधावीत.<br>• पावसाचा अंदाज पाहून व पावसाची उघडीप बघून पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करावी.<br>• खरीप पिकांची काढणी, मळणी पावसाचा अंदाज पाहून व पावसाची उघडीप बघून करावी व सदर पिकांचे पावसाने नुकसान होऊ नये याकरिता काढलेल्या पिकांची सुरक्षित ठिकाणी साठवण करावी.<br>• जिल्ह्यातील रब्बी ज्वारी व जिरायत हरभरा पिकांची पेरणी करणेसाठी जमिनीची पुर्वमशागत करुन जमिन तयार करावी. रब्बी ज्वारी व इतर पिकांची जमिनीच्या पुरेश्या ओलाव्यावर व योग्य खोलीवर बीजप्रक्रिया करून पेरणी करावी.<br>• शेतकरी बंधूनी हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमाना करीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा. |

| | | |
|---|---|---|
| | | • तसेच शेतकरी बंधूनी मेघगर्जना व विजेचा पूर्वानुमाना करीता दामिनी मोबाईल ॲपचा वापर करावा. |
| कापूस | बोंडे अवस्था | सध्याच्या ढगाळ व दमट हवामानामुळे कापूस पिकावरील रस शोषणाऱ्या किडींच्या नियंत्रणासाठी ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी पावसाचा अंदाज पाहून व पावसाची उघडीप बघून करावी. कापूस पिकावरील पांढऱ्या माशीच्या नियंत्रणासाठी फ्लोनिक्यामिड ५० डब्ल्यूजी. ४ ग्राम किंवा डीनोटेफ्युरान २० % एसजी. ३ ग्राम प्रति १० लिटर पाण्यातून पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी. गुलाबी बोंड अळीच्या नियंत्रणासाठी (रासायनिक) नियंत्रणासाठी प्रोफेनोफॉस ५० ई .सी. २० मिली किंवा स्पिनोसॅड ४५ एस.सी. ३.५ मिली किंवा थायोडीकार्ब ७५ डब्लू.पी. २० ग्राम प्रति १० लिटर पाण्यातून पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी. कापुस पिकात पाने, फुले, बोंडे यांची गळ कमी होण्यासाठी प्लॅनोफिक्स या संजिवकाची एकरी ४० मिली प्रति १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| सोयाबीन | पक्वता ते काढणी | सोयाबीनच्या उभ्या पिकात शेतामध्ये चर काढून पाण्याचा चांगला निचरा करावा व शेतामध्ये हवा खेळती ठेवावी. पाऊस थांबताच पक्व पिकाची काढणी करून काडाचे छोटे छोटे ढीग करून प्रखर सूर्य प्रकाशात वाळवावे. त्यानंतर प्रादुर्भाव / उगवण झालेल्या शेंगा बाजूला काढून मळणी करावी. |
| भुईमुग | शेंगा भरणे ते पक्वता | पावसाचे पाणी शेतात, उभ्या पिकात साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्यासाठी उताराच्या बाजूने चर काढावी. पाऊस थांबताच पक्व पिकाची काढणी करावी. |
| तुर | फुलोरा | पावसाचे पाणी शेतात, उभ्या पिकात साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्यासाठी उताराच्या बाजूने चर काढावी. तूर पिकामध्ये मर रोगाचे नियंत्रणासाठी ट्रायकोडर्मा १० ग्राम प्रती १ लिटर पाण्यात मिसळून ५०-१०० मिली प्रती झाड आळवणी (ड्रेंचिंग) करावे. तूर पिकावरील पाने गुंडाळणारी अळीच्या नियंत्रणासाठी ५ % निबोंळी अर्काची फवारणी करावी. |
| मिरची | | सध्याच्या ढगाळ व दमट हवामानामुळे मिरची पिकात पानावरील ठिपके दिसताच कॉपर ऑक्झिक्लोराईड किंवा क्लोरोथॅलोनील २५ ग्रॅम प्रति १० लीटर पाण्यातून फवारणी करण्यात यावी. मर रोग नियंत्रणासाठी २५ ग्रॅम कॉपर ऑक्झिक्लोराईड १० लीटर पाण्यामध्ये मिसळून प्रती झाडास ५० मिली. प्रमाणे जिरवण करण्यात यावी. |
| केळी | पिक वाढीची अवस्था | सध्याच्या हवामानामुळे केळी पिकावर फुलकीडीच्या नियंत्रणासाठी किळीचे घड ६ टक्के सच्छीद्रतेच्या पॉलीथीन पिशव्यांनी झाकावेत. तसेच मावा किडीच्या नियंत्रणासाठी डायमेथोएट २० मिली प्रती १० लिटर पाण्यातून फवारावे. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | सर्व जनावरांना चपटे कृमी (लिव्हर फ्ल्यूक) रोग प्रतिबंधक उपाय म्हणून पशु वैद्यकाच्या सहाय्याने लसीकरण करून घ्यावे. पोटातील जंताच्या नियंत्रणासाठी पशु वैद्यकाच्या सहाय्याने जंतनाशक पाजावे. जनावरांना रोग प्रतिबंधक उपाय म्हणून पशु वैद्यकाच्या सहाय्याने योग्य वेळी लसीकरण करून घ्यावे तसेच जनावरांना व पक्ष्यांना नेहमी पिण्यास स्वछ पाणी द्यावे. |
| ***टिप : शेतकरीबंधूनी पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी.** | | |

**स्त्रोत :**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : -

ठिकाण : कृ .म.वि., पुणे.

दि. : १६.१०.२०२०

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा**

**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**